## ७.७ इयत्ता ७ वी – मराठी (प्रथम भाषा) पाठ्यक्रम

**उद्दिष्टे :–** विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नातून पुढील उद्दिष्टे साध्य करावी यासाठी चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. घर, परिसर आणि समाज यांच्या संदर्भातील घडामोडी, सामाजिक समस्या यासंबंधी जाणीव निर्माण होणे, त्यासंबंधी प्रश्न विचारणे, आपली मते मांडणे.

२. चर्चेत सहभागी होताना पुराव्यांच्या आधारे जबाबदारीने विधाने करणे.

३. पाठ्य व पाठ्येतर वाचनसाहित्यांत येणाऱ्या बोलीभाषांतील मजकूर समजून घेणे, त्यांच्याबद्दल आदर बाळगणे आणि त्यातून व्यक्त होणारे संस्कृतिविशेष समजावून घेणे.

४. विविध साहित्यप्रकारांचे वाचन वा श्रवण करून त्यांची वैशिष्ट्ये समजून घेणे.

५. कथा, कविता, लेख यांच्या प्रकटवाचन कार्यक्रमांत उत्साहाने सहभागी होणे.

६. एकाच विषयावरील विविध कवितांचे वाचन करून त्यातील वस्तुस्थिती, कविकल्पना, भाषासौंदर्य इत्यादी विशेषांची तुलना करणे.

७. दिलेल्या विषयांवर आपल्या बोली भाषेत रचना करणे.

८. अनुभवलेल्या, पाहिलेल्या, ऐकलेल्या अथवा वाचलेल्या घटनांवर आधारित भाषण, वर्णन, कथालेखन तसेच नाट्यीकरणादी उपक्रमांत सहभागी होणे.

९. एका मिनिटांत ९० शब्द या गतीने आकलनासह मूकवाचन करणे.

१०. वाचनशब्दसंपत्तीची सुमारे ४५०० शब्दांपर्यंत वाढ करणे.

११. दिलेल्या उताऱ्याचे सुमारे एकतृतीयांश लांबीचे सारांशलेखन करणे

१२. दिलेल्या कल्पनेचा सुमारे दोन–तीन परिच्छेदांत विस्तार करणे.

१३. स्वरसंधी, व्यंजनसंधी तसेच शब्दालंकारातील यमक आणि अर्थालंकारातील दृष्टांत, उत्प्रेक्षा यांची ओळख करून घेणे.

१४. मालिनी, वसंततिलका या वृत्तांचा परिचय करून घेणे.

१५. संदर्भासाठी शब्दकोश, ज्ञानकोश, संस्कृतिकोश यांचा तसेच आंतरजालावरील संकेतस्थळे तंत्राचा उपयोग करणे.

# इयत्ता ७ वी – मराठी (प्रथम भाषा) पाठ्यक्रम

## अध्ययन क्षेत्र – १. घरातील आणि परिसरातील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| माहितीचे स्रोत | **पालक, मित्र**<br>स्थानिक वृत्तपत्रे, राज्य व देशपातळीवरची वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणीवर चर्चिल्या जाणाऱ्या वृत्तांसंबंधीच्या चर्चेत स्वतःची स्वतंत्र मते मांडायला सहभागी करून घेणे. | विविध पातळ्यांवर चर्चिल्या जाणाऱ्या आरोग्य, शेती, पाणी, पर्यावरण, वैज्ञानिक प्रगती इ. बद्दलच्या वृत्तांसंबंधात चाललेल्या घरातील अथवा परिसरातील चर्चेत भाग घेणे प्रतिष्ठित आणि खात्रीलायक स्रोतांतून मिळालेल्या माहितीच्या आधारे आपली मते ठामपणे मांडणे. | प्रतिष्ठित आणि खात्रीलायक स्रोतांचे महत्त्व अधोरेखित होते. | विश्वास संपादन केलेल्या वृत्तपत्र, आकाशवाणी, दूरचित्रवाहिनी, आंतरजाल इ. माहितीचे स्रोत यांबद्दल आदर वाढतो. | सार्वजनिक ठिकाणी बोलताना काळजीपूर्वक विधाने करतात. | अनौपचारिक मूल्यमापन |

## अध्ययन क्षेत्र – २. वर्ग, शाळा आणि समाज येथील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| बोलीभाषा | **शिक्षक** बोलीभाषेतील कथा, लोकगीते, आत्मकथन वाचायला देणे आणि त्यासंबंधी विद्यार्थ्यांची मते जाणून घेणे. | विविध प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त होणे– अर्थ कळण्यात अडचणी येणे; परिसराची, घरातील व्यक्तींची, मित्रांची, बालपणीच्या अनुभवांची आठवण होणे; शब्दार्थ कळल्यावर विचारांतील व्यापक अर्थाची जाणीव होणे इत्यादी. | – | – | – | – |
| | विविध मतांचे स्वागत करणे. आपापल्या पूर्वानुभवातील मर्यादांमुळे अडचणी | – | – | नव्या माहितीमुळे, दृष्टिकोनामुळे संपन्न झाल्याची भावना अनुभवतात. | मराठीच्या वेगवेगळ्या बोलीभाषेतील कथा, कविता, आत्मकथने वाचून | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | कशा येतात, हे समजावून देणे. आज प्रमाणभाषा म्हणून प्रतिष्ठा प्राप्त झालेली भाषा ही देखील प्रत्यक्षात एक बोलीच आहे हे लक्षात आणून देणे. त्याबरोबर बोलीभाषेतील वेगळ्या शब्दांकडे, त्यामागील जिवंत अनुभवांकडे, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भांकडे लक्ष वेधणे. आपल्यापेक्षा वेगळे अनुभव समजून घेतल्यामुळे आपली दृष्टी कशी विशाल होते; आपले राज्य, आपला देश याबाबतीत किती संपन्न आहे याची कल्पना देणे. | | | | समजून घेतात. आपले अनुभव आपापल्या बोलीभाषेत लिहून शाळेच्या नियतकालिकात देतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| चर्चा | पारंपरिक कलाकार (वासुदेव, गोंधळी, शाहीर, कीर्तनकार इत्यादी) तसेच आधुनिक ललित कलाकार (नट, नर्तक, निवेदक, अभिवाचक इत्यादी) यांच्याकडून घडणारे भाषेचे जतन, त्यांचे गुण, त्यांचे सामाजिक महत्त्व यावर चाललेल्या चर्चेत सहभागी करून घेणे. | चर्चेतून मिळणारी अनेक प्रकारची नवी माहिती लक्षपूर्वक ऐकणे, प्रश्न विचारून त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल जाणून घेणे. | आपल्या सामाजिक जीवनातील कलाकारांचे महत्त्व लक्षात येते. | कलाकारांबद्दल आदर व कृतज्ञतेची भावना अनुभवतात. | कलाकारांबद्दल विविध स्रोतांतून माहिती गोळा करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| सर्वेक्षण, मुलाखती | उपक्रमासंबंधी माहिती देणे, आकाशवाणी, दूरदर्शनवरील मुलाखती ऐकण्या–पाहण्यास सांगणे. वंचितांमधील शालेय वयाच्या मुलांच्यासंबंधी माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली आणि मुलाखतपत्रिका पुरविणे. प्रात्यक्षिकासह सूचना दणे. | वंचित समाजघटकांच्या वस्तीत फिरून मुलांबरोबर गप्पा मारून आणि मोठ्यांच्या मुलाखती घेऊन मिळविलेली माहिती प्रश्नावली व मुलाखत पत्रिका यात नोंदवून घेणे. | समाजातील विषमतेची कल्पना येते. | समाजातील वंचित घटकांबद्दल सहानुभूती निर्माण होते. | समाजातील वंचित समाजघटकांच्या समस्यांबद्दल वाचनातून अधिक माहिती मिळवितात. | उपक्रमातील सहभागाचे मूल्यमापन |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| कविता, कथा | परिस्थितीमुळे शिकण्यात अडचणी येणाऱ्या परंतु शिकण्याची जबरदस्त इच्छा असणाऱ्या मुलांसंबंधीच्या पाठ्य-पाठ्येतर वाचन साहित्यातील कविता आणि कथा वाचून दाखविणे. त्यासंबंधी चर्चा आयोजित करणे. | चर्चेत भाग घेऊन बालकांचे शिकण्याचे हक्क आणि त्यांच्या व्यथा कवी, लेखकांनी कोणत्या शब्दांत मांडल्या आहेत याबद्दलचे आपले म्हणणे उदाहरणांसह सुसंगतरीत्या मांडणे. | इतरांची मते समजतात. वंचित वस्तीतील मुलांच्या समस्या समजतात. | वंचित समाजघटकांबद्दल संवेदनशीलता निर्माण होते. बोलण्या-वागण्यातून व्यक्त होते. | गरजू विद्यार्थ्यांना मदत करतात. या विषयावरील कथा, कविता वाचतात. | निरीक्षण व नोंद उपक्रम |
| वाचनसवयी | परिचित आणि अपरिचित विषयांवरील सारख्या शब्दसंख्येचे उतारे वाचायला देणे, | दोन्ही उताऱ्यांचे वाचन करणे. प्रत्येक वाचनात एक मिनिटाचा वेळ संपल्याची खूण होताच तिथल्या शब्दाखाली रेघ | – | – | विविध प्रकारच्या वाचन साहित्याचे आवर्जून वाचन करतात. | निरीक्षण व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | त्यांना लागलेला वेळ नोंदविणे, तसेच त्यावर विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांना गुण देणे. | ओढणे. उतारा पूर्ण वाचून झाल्यावर त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहिणे, तसेच रेघ मारलेल्या शब्दापर्यंतचे एकूण शब्द मोजणे | – | – | | |
| | दोन्ही उताऱ्यांच्या वाचनाला लागलेला वेळ आणि मिळालेले गुण यांच्यातील फरकाची कारणे शोधण्यास व निष्कर्ष काढण्यास सांगणे. | परिचित उताऱ्याच्या वाचनाला लागलेला कमी अथवा जास्त वेळ आणि मिळालेले जास्त अथवा कमी गुण यांची नोंद करणे व काढलेला निष्कर्ष सांगणे. | अर्थग्रहण आणि जलद वाचन यांच्या संबंधाची जाण येते. | – | वाचताना अर्थग्रहण एककाची लांबी वाढविण्यासाठी सतत अर्थपूर्ण वाचन करतात. | तोंडीकाम |

## अध्ययन क्षेत्र – ३. भाषेच्या नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| स्वरसंधी | **शिक्षक**<br>पुढे दिलेल्या शब्दांचा तक्ता लावून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या आधारे चर्चा करणे–<br>''आज आपण शब्दांचा खेळ खेळणार आहोत. हे शब्द वाचा.''<br>जिजाई, स्वाभिमान, पूर्वोत्तर, सूर्यास्त, कालावधी, महेश्वर, सुवर्णालंकार, जोडाक्षर, भाषांतर, जन्मोत्सव, रेखाकृती, भ्रष्टाचार, देवालय, चंद्रास्त, हिमालय, | एकेक शब्द मोठ्याने वाचणे. | शब्द ऐकताना उच्चारांवरून त्यातील काही शब्दांचा सारखेपणा जाणवतो. | खेळातील गंमत अनुभवतात. | – | – |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | गीताई, गिरीश, महात्मा, महेश, शिवालय, तारांगण, सर्वेश्वर, ग्रंथालय, देशाभिमान, शिष्टाचार, देवानंद, मुक्तांगण, जिल्हाधिकारी, रूपांतर, सूर्योदय, भाषाभिमान, चित्राकृती, हस्ताक्षर, सैन्याधिकारी, महेश, देवात्मा<br>**सूचना–**<br>१. उच्चारांत सारखेपणा असलेले शब्द एकत्र करा, लिहा. | सारखे शब्द शोधून लिहिणे. | | | | वर्गकार्य |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | २. प्रत्येक शब्दात दोन शब्द एकत्र आलेत ते शोधा, लिहा. ३. पहिल्या शब्दाचे शेवटचे अक्षर आणि दुसऱ्या शब्दाचे पहिले अक्षर एकत्र उच्चारा, काय घडते? एकत्र येणे याचे वर्णन कोणत्या शब्दात कराल? छान! यालाच 'संधी होणे' असेही म्हणतात. ४. येथे ज्या अक्षरांचे संधी झाले आहेत त्यांना व्याकरणात काय नाव आहे?. ५. स्वरसंधीची व्याख्या करा. | दोन शब्दांमध्ये अधिकचे चिन्ह काढून लिहिणे.<br>संबंधित अक्षरांचा एकत्र उच्चार करणे.<br>'जोडणे' यासारखे उत्तर देणे.<br>स्वर<br>व्याख्या तयार करून सांगणे. | एकत्र उच्चार करताना वेगळेच अक्षर उच्चारले जाते हे लक्षात येते. | — | संधी झालेले शब्द दिले असता त्यात दडलेले दोन शब्द शोधतात. | लेखी चाचणी (संधी सोडविणे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| व्यंजनसंधी | वरील पद्धतीचा उपयोग करताना व्यंजनसंधीयुक्त शब्दांचा समावेश करणे. | निरीक्षण, वर्गीकरण, अनुमान इ. प्रक्रियांचा उपयोग करून व्यंजनसंधी होतानाच्या प्रक्रिया लक्षात घेणे. | व्यंजनांचा संधी होतानाचा वेगळेपणा लक्षात येतो. | – | संधी झालेले शब्द दिले असता त्यात दडलेले दोन शब्द शोधतात. | लेखी चाचणी |
| अर्थालंकार– रूपक, उत्प्रेक्षा | उपमा अलंकारयुक्त काही वाक्ये वाचावयाला देऊन अलंकार ओळखून घेणे. त्यातील सम, सारखा या सारखे शब्द वगळून तसेच 'जणू काही', 'भासे' यांसारखे शब्द योजून इष्ट ते बदल करून तीच वाक्ये वाचावयाला देणे. | बदललेल्या वाक्यांचे निरीक्षण करणे. तीच कल्पना किती वेगवेगळ्या रीतीने प्रकट करता येते हे लक्षात घेऊन नव्या दोन प्रकारांचे विशेष नोंदविणे आणि त्यांच्या आधारे आणखी उदाहणांचा पडताळा घेऊन शेवटी दोनही अलंकारांच्या व्याख्या तयार करणे. | प्रकटीकरणाच्या सामर्थ्याची जाणीव होते. | आलंकारिक भाषेने निर्माण होणाऱ्या भाषिक सौंदर्याचा आनंद अनुभवतात. | पाठ्य व पाठ्येतर वाचन साहित्यातून तीनही अलंकारांची उदाहरणे लिहून घेतात. | निरीक्षण व नोंद चाचणी |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| वृत्त, लघु, गुरू अक्षरे, अक्षरगणवृत्ते, भुजंगप्रयात, मालिनी, वसंततिलका | वेगवेगळ्या वृत्तांतील पद्यपंक्ती म्हणून दाखविणे. ऱ्हस्व, दीर्घ उच्चारांकडे लक्ष वेधणे. | लक्षपूर्वक श्रवण करणे. | अक्षरे आणि त्यांचे उच्चार यांची नोंद घेतात. | | | चाचणी |
| | विद्यार्थ्यांकडूनही ऱ्हस्व, दीर्घ उच्चारांसह योग्य प्रकारे म्हणवून घेणे. | योग्य प्रकारे उच्चारण करणे. | | – | – | – |
| | नंतर भुजंगप्रयात, मालिनी आणि वसंततिलका वृत्तांच्या चार चरणांच्या तीन तीन रचना निरीक्षणासाठी गटात देणे. चालीत साम्य असलेल्या रचनांचे गट | ऱ्हस्व–दीर्घ उच्चारांकडे लक्ष देऊन एकमेकांना पद्यपंक्ती ऐकविणे. समान चाली असलेल्या पद्यपंक्तीमध्ये जागा सोडून एकाखाली एक लिहिणे. | उच्चारांच्या आकृतिबंधाची तुलना करतात. अनुमान बांधतात. कवींवर येणाऱ्या बंधनांची जाणीव होते. | नवे आव्हान पेलल्याचा आनंद घेतात. | दिलेल्या पद्यपंक्तींचे गण पाडून वृत्ते ओळखतात, लिहितात. | लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | करावयास सांगणे. त्यासंबंधी सविस्तर सूचना देणे. | प्रत्येक पंक्तीतील अक्षरे मोजून ती संख्या पंक्तीसमोर लिहिणे. नंतर प्रत्येक पंक्तीतील प्रत्येक अक्षराखाली उचित अशी ऱ्हस्वता अथवा दीर्घतादर्शक खूण करणे. | | | | |
| | विद्यार्थी काम करीत असताना जेथे अडतील तेथे आवश्यक तेवढेच मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांनी काढलेले निष्कर्ष तपासून संबंधित वृत्ताचे नाव व लक्षणे सांगणे. | ऱ्हस्वदीर्घता दर्शक खुणांतून तयार होणाऱ्या आकृतिबंधाची (गणांची) नोंद घेणे. अक्षरगणांचे निरीक्षण करून निष्कर्ष काढणे. परस्परांचे निष्कर्ष पडताळून पाहणे. | अक्षरे आणि त्यांचे उच्चार यांची नोंद घेतात. | – | – | – |

## अध्ययन क्षेत्र – ४. साहित्यिक अभिव्यक्तींचा आस्वाद

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| गद्य साहित्यातील सौंदर्य | **शिक्षक** पाठ्यपुस्तकातील गद्य पाठांचे प्रथम विषयाच्या संदर्भात वर्गीकरण करायला सांगणे. नंतर त्याच पाठांचे निबंध, कथा, नाट्यप्रवेश, विनोदी लेख यांमध्ये वर्गीकरण करायला सांगणे. | सूचनेनुसार वर्गीकरण करणे | साहित्यात एकच विषय वेगवेगळ्या पद्धतीने मांडला जातो हे लक्षात येते. | नव्या ज्ञानाचा आनंद होतो. | पाठ्येतर वाचन करतानाही त्यांचे विषयानुसार वर्गीकरण करतात. | निरीक्षण व नोंद |
| निबंध | वेगवेगळ्या निबंधांतील मुख्य विचार, प्रत्येक परिच्छेदात मांडलेला विचार आणि त्यात दिलेली उदाहरणे, सुविचार, सुवचने | सूचनेनुसार वर्गीकरण करताना निबंधांच्या मांडणीसंबंधी आपले विचार मांडणे | निबंधाला विशिष्ट मांडणी, तसेच उदाहरणादी अन्य विशेषांची आवश्यकता असावी लागते हे जाणवते. | नव्या ज्ञानाचा आनंद होतो. | निबंध वाचत असताना त्याच्या मांडणीकडे तसेच अन्य विशेषांकडे लक्ष देतात. | उपक्रम |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | शोधावयास सांगणे. यावरून दिसणारे निबंधांचे विशेष नोंदविण्यास सांगणे | | | | | |
| कविता – एकाच विषयावरील | 'आई' या विषयावर यशवंत, माधव ज्युलियन, फ. मु. शिंदे इत्यादींच्या कविता वाचून दाखविणे. नंतर त्या गटात वाटून देणे. | आपल्या वाचनाला आलेल्या कवितांचे सूचनांनुसार विशेष शोधून काढणे.<br><br>कवींनी आपल्या भावना, विचार, प्रकट करण्यासाठी वापरलेल्या कल्पना, शब्द, अलंकार इत्यादींबद्दल इतर गटांना माहिती देणे. | कवींच्या शब्दसामर्थ्याची जाणीव होते. | कवितावाचन ऐकताना त्यातील भावनांशी समरस होतात. | अशाच प्रकारे एकाच विषयारील वेगवेगळ्या कविता मिळवून त्यांचा आस्वाद घेतात. | उपक्रम विषयावर लेख स्पर्धेचे आयोजन |

## अध्ययन क्षेत्र – ५. स्व-प्रकटीकरणाचे प्रयत्न

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| बोली भाषेतील रचना | विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेत तयार झालेले साहित्य वाचायला देणे. त्यांना बोलीभाषेत लिहायला प्रोत्साहन देणे. | दिलेल्या विषयांवर आपल्या बोलीभाषेत लिहिण्याचा प्रयत्न करणे. | बोलीभाषेत प्रकटीकरण सहज होते, याचा अनुभव घेतात. | निर्मितीचा आनंद घेतात. | आपल्या निर्मितीचे सादरीकरण करतात. | निरीक्षण व नोंद<br>उपक्रम |
| घोषणा, व्यंगचित्रे, भाषणे – समस्येविषयीच्या जागरणासाठी | प्रकल्पासाठी विविध साहित्य तयार करायला प्रोत्साहन देणे. | आपापल्या आवडीचे साहित्य तयार करणे. | समस्या निवारणातील जनजागरणाचे महत्त्व पटते. | निर्मितीचा आनंद घेतात. | आपल्या निर्मितीचे सादरीकरण करतात. | निरीक्षण व नोंद<br>प्रकल्प |

## ७.८ इयत्ता ८ वी – मराठी (प्रथम भाषा) पाठ्यक्रम

**उद्दिष्टे :–** विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नातून पुढील उद्दिष्टे साध्य करावी यासाठी चेतक आणि पोषक वातावरण निर्माण करणे–

१. घर, परिसर व समाजात घडणाऱ्या घटनांसंदर्भातील चर्चेत सहभागी होताना समस्यांवर सुचलेल्या उपायांची समर्पक शब्दांत मांडणी करणे.

२. वाचनसाहित्यात आलेल्या बोलीभाषेतील शब्दांचे सांस्कृतिक संदर्भ समजून घेणे.

३. आपापल्या बोलीतून आपले विचार, कल्पना, भावना योग्य प्रकारे तोंडी व लेखी स्वरूपात मांडता येणे.

४. विविध प्रकारच्या साहित्यकृती वाचून त्यातील अनुभवविश्वाचा परिचय करून घेणे.

५. एकाच लेखकाचे/लेखिकेचे, कवीचे/कवयित्रीचे विविध प्रकारचे साहित्य वाचून त्याबद्दल मित्रांबरोबर चर्चा करणे.

६. स्वतःचे नित्य वा नैमित्तिक अनुभव आपल्या आवडत्या साहित्यप्रकारातून तोंडी वा लेखी स्वरूपात मांडता येणे.

७. विविध प्रकारच्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांच्या मुलाखतीतून लोकजीवन व लोकभाषा समजून घ्यायचा प्रयत्न करणे.

८. साहित्यातून परिचित झालेल्या विविध सामाजिक समस्यांबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी अधिक वाचन व जाणकारांशी चर्चा करणे.

९. साहित्यप्रकारांचे भावपूर्ण अभिवाचन करणे.

१०. दिलेल्या विषयावर मुद्देसूदपणे सुमारे १०० ते १५० शब्दांचा निबंध लिहिणे.

११. माहिती–संप्रेषण तंत्रज्ञानाचा दैनंदिन भाषिक देवाण–घेवाणीत उपयोग करणे.

१२. दिलेल्या उताऱ्याचे सुमारे एकतृतीयांश शब्दांत सारांशलेखन करता येणे.

१३. दिलेल्या कल्पनेचा दोन–तीन परिच्छेदांत विस्तार करता येणे.

१४. समासाचे मुख्य प्रकार व विभक्तीचे कारकार्थ समजून घेणे.

१५. कवितेतील मुक्तछंदाची आवश्यकता आणि त्याची प्रातिनिधिक उदाहरणे समजून घेणे.

१६. गद्य, पद्य साहित्यातील श्लेष, स्वभावोक्ती आणि दृष्टांत अलंकारांचा परिचय करून घेणे.

१७. एक मिनिटात सुमारे १०० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करणे.

१८. वाचनशब्दसंपत्तीत सुमारे ५००० शब्दांपर्यंत वाढ करणे.

१९. शब्दकोश, ज्ञानकोश, संस्कृतिकोश तसेच आंतरजाल तंत्रज्ञान यांचा संदर्भासाठी उपयोग करणे.

# इयत्ता ८ वी – मराठी (प्रथम भाषा) पाठ्यक्रम

## अध्ययन क्षेत्र – १. घरातील आणि परिसरातील भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| समस्यांवरील उपाय | **पालक, शेजारी** मुलांनी सार्वजनिक जीवनातील समस्येविषयी दाखविलेल्या जागरूकतेबद्दल कौतुक करणे आणि उपाययोजनांबद्दल चर्चा करणे. | परिसरातील प्रदूषणाच्या समस्येबद्दल प्रश्न विचारणे, शाळेत मिळालेल्या माहितीच्या आधारे उपाय सुचविणे. चर्चेत उपस्थित केलेल्या शंकांबद्दल उत्तरे देणे. इष्ट त्या सूचनांबद्दल सहमती दर्शविणे. | चर्चेत उपस्थित मुद्द्यांबद्दल सारासार विचार केला जातो हे लक्षात येते. | दुसऱ्यांच्या मतांबद्दल आदर व्यक्त करतात. | भोवताली घडणाऱ्या घटनांबद्दल सजगता दाखवितात. | मोठ्यांकडून अनौपचारिक मूल्यमापन |
| माहितीसंप्रेषण तंत्रज्ञानाची परिभाषा | संगणकाच्या उपयोगांविषयी विविध शंका विचारणे. | शाळेत आणि मित्रांच्या चर्चेत आलेली तसेच स्वतः शोधून काढलेली माहिती पुरविणे. | विचारलेल्या शंकांचे पृथक्करण करून योग्य उत्तरे देतात. | मोठ्या व्यक्तींच्या शंकांचे निरसन करू शकल्याबद्दल समाधान वाटते. | संगणकाच्या माहिती संप्रेषणाच्या नव्या उपयोगांची माहिती घेत राहतात. | मोठ्यांकडून अनौपचारिक मूल्यमापन |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| जिज्ञासा, शंकासमाधान | मुलांच्या वयानुरूप निर्माण होणाऱ्या शंका समजून घेणे. मित्रत्वाच्या नात्याने सल्ला देणे. | शरीरात पडणारे फरक, कानावर आलेल्या अथवा वाचलेल्या माहितीची सत्यता पडताळणे. | वेगवेगळ्या स्रोतांकडून मिळालेल्या माहितीची तुलना करतात. | मोठ्या माणसांच्या मोकळेपणाचा विश्वास वाटतो. | विश्वासार्ह स्रोतांकडून माहिती मिळवितात, पडताळा पाहतात. | मोठ्यांकडून अनौपचारिक मूल्यमापन |
| छंद | मुलांच्या भाषिक आवडी–निवडी लक्षात घेऊन त्याबद्दल चर्चा करणे, शक्य ते साहाय्य करणे. | आवडत्या कवी, लेखकांच्या विचारांचा, कल्पनांचा संग्रह दाखविणे, त्यावरील स्वतःची मते मांडणे. | कवी, लेखकांबद्दलची आपली मते आग्रहाने मांडतात. | छंदाच्या केलेल्या कौतुकाने सुखावतात. | आवडते कवी, लेखक, लेखनप्रकार उत्साहाने वाचतात. | – |

## अध्ययन क्षेत्र – २. वर्ग, शाळा आणि समाज येथे चालणारी भाषिक आंतरक्रिया

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| साहित्यातील जीवनानुभव | आत्मकथन, कथा, आत्मपर, सामाजिक जीवनावर भाष्य करणाऱ्या कविता इत्यादी साहित्यप्रकारांतून प्रकट होणारे जीवन समजून घेण्यासाठी संदर्भकोश, आंतरजाल, इत्यादी माहितीस्रोत उपलब्ध करून देणे | प्रादेशिक, दलित, शहरी, ग्रामीण यांसारख्या साहित्यप्रकारांतील जीवनानुभव समजून घेण्यासाठी संदर्भ शोधणे. विशेषतः चालीरीती, रूढी, परंपरा यांचा दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम, त्याचे भाषिक देवाणघेवाणीत पडलेले प्रतिबिंब समजून घेण्यासाठी माहितीचे मूलस्रोत शोधणे. | जीवनावर परिसराचा होणारा परिणाम लक्षात येतो. प्रकटीकरणात समान अनुभव–सुद्धा कसे वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त होतात ते समजते. | आपल्यापेक्षा वेगळे जीवन जगणाऱ्यांबद्दलची संवेदनशीलता वाढते. | वेगवगळे साहित्यप्रकार मिळवून त्यात प्रतिबिंबित झालेले जीवन समजून घेतात. त्यावर स्वतःची मते मांडणारा लेख लिहितात. | प्रकल्प, चाचणी,<br><br>तोंडी काम (चर्चा) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| जाणकारांशी संवाद | लोकसाहित्यातील जीवनाशी परिचित असणाऱ्या व्यक्ती, लेखक, अभ्यासक यांच्याशी संवाद घडवून आणणे, शक्य नसल्यास ध्वनिचित्रफितीद्वारे अप्रत्यक्ष अनुभव देणे. | विविध प्रकारे प्रकट झालेले साहित्यातील जीवन आणि वास्तव यांचे नाते समजून घेण्यासाठी लेखकांच्या, अभ्यासकांच्या मुलाखती घेणे, विविध लोकवस्तींना भेटी देणे, शक्य नसल्यास ध्वनि–चित्रफितीद्वारे अप्रत्यक्ष अनुभव घेणे. ऐकलेल्या, पाहिलेल्या अनुभवांवर चर्चा करणे | पारंपरिक साहित्य ठेव्याची जाणीव होते. | आपल्या पारंपरिक ठेव्याचा अभिमान वाटतो. | परिसरात फिरणाऱ्या लोक कलाकारांकडून त्यांच्या परंपरांची माहिती घेतात. | प्रकल्प, चाचणी, तोंडी काम (चर्चा) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अभिवाचन | साहित्यप्रकारांच्या अभिवाचनाचे नमुने रेडिओ, शालेय, सांस्कृतिक कार्यक्रमांतून ऐकविणे. त्यावर चर्चा आयोजित करणे. | अभिवाचनाचे कार्यक्रम लक्षपूर्वक ऐकणे, त्यातील काय आवडले, का आवडले यावर चर्चा करणे, स्वतः अभिवाचनात सहभागी होणे. | अभिवाचनाच्या श्रवणाने साहित्य अधिक चांगले का समजते याचे पृथक्करण करतात. अर्थाचे आकलन आणि आवाजातील आरोह–अवरोह यांच्यातील संबंध लक्षात येतो. | अभिवाचनाच्या कार्यक्रमाचा आनंद घेतात. | अभिवाचनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतात. | तोंडी चाचणी (अभिवाचन) |
| चर्चा | साहित्यातून चित्रित झालेल्या सामाजिक समस्यांवर वर्गात चर्चा आयोजित करणे. | सामाजिक समस्यांसंबंधी विविध स्रोतांद्वारे मिळविलेली माहिती वर्गात सादर करणे. समस्यांच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेणे. त्यावरच्या उपाययोजनांसंबंधी चर्चा करणे. वर्गाकरिता जनजागृतीचा कृति–कार्यक्रम आखणे. | सामाजिक समस्या रुढीतून, अंधश्रद्धांतून निर्माण होतात याची, तसेच त्या दूर करण्यासाठी होत असलेल्या जनजागृतीची जाणीव होते. | जनजागृती कार्यक्रमात स्वतः सामील झाले पाहिजे याची जाणीव होते. | जनजागृती प्रकल्पात सहभागी होतात. | प्रकल्प |

## अध्ययन क्षेत्र – ३. भाषेच्या नियमव्यवस्थेचा परिचय

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| कारकार्थ | केवळ शब्दांपुढे शब्द ठेवून तयार केलेला मजकूर आणि त्याच शब्दांना योग्य विभक्ती प्रत्यय लावून तयार झालेला मजकूर असे दोन तक्ते शेजारी लावून त्यातील फरकासंबंधी प्रश्न विचारणे. वाक्यातील शब्दांना, विशेषतः नामे, सर्वनामे आणि क्रियापदे यांना जोडणाऱ्या अक्षरसमूहांची विभक्तिप्रत्ययांची कामे स्पष्ट करणे. कारकार्थ या शब्दांचा परिचय करून देणे. | दोन तक्त्यांची तुलना करून फरकामुळे झालेला परिणाम सांगणे. परिणामाला कारणीभूत ठरलेले अक्षरसमूह आणि त्यातील साम्यभेद सांगणे. समान अक्षरसमूहांनी वाक्यात केलेले कार्य सांगणे. | विभक्ती प्रत्ययाचे महत्त्व समजते.<br><br>विभक्ती प्रत्ययाची कार्ये लक्षात येतात. | नव्या ज्ञानाचा आनंद होतो. | दिलेल्या उताऱ्यातील विभक्ती प्रत्यय शोधून त्यांचे कार्य स्पष्ट करतात. | लेखी (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| समास, विग्रह<br><br>पद | सामासिक शब्दांची कार्डे, तसेच विग्रहाची कार्डे गटांत वाटणे. करावयाच्या कामाच्या सूचना देणे. | सामासिक शब्दांची कार्डे व विग्रहाची कार्डे यांच्या जोड्या लावणे. सामासिक शब्द आणि त्यांचे विग्रह यांचे निरीक्षण करून प्रत्येक सामासिक शब्दांत कोणते पद (शब्द) महत्त्वाचे आहे ते शोधणे. | अर्थ कायम ठेवून अल्प शब्दांत अर्थ व्यक्त करण्याचे सामासिक शब्दांचे सामर्थ्य लक्षात येते. | आपल्या भाषेचा अभिमान वाटतो. | | |
| समासांचे मुख्य प्रकार– (अव्ययीभाव, तत्पुरुष, द्वंद्व, बहुव्रीही) | फलकावर चार रकाने पाडून त्यांना अनुक्रमे प्रथमपदप्रधान, द्वितीयपदप्रधान, उभयपदप्रधान आणि अन्यपदप्रधान अशी नावे देणे. करावयाच्या कामाच्या सूचना देणे. | सामासिक शब्दांतील महत्त्वाच्या पदानुसार योग्य त्या रकान्यात त्यांची नोंद करणे. समासांच्या प्रत्येक प्रकाराची वैशिष्ट्ये सांगून त्याची व्याख्या तयार करणे. | – | आपल्या भाषेचा अभिमान वाटतो. | दिलेल्या सामासिक शब्दांचा विग्रह करून प्रकार ओळखतात. | लेखी काम (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| अलंकार– श्लेष | दोन अर्थ असलेल्या शब्दांचा उपयोग केलेल्या वाक्यांच्या पट्ट्या गटात वाटणे. करावयाच्या कामाच्या सूचना देणे. | गटाकडे आलेल्या वाक्यांचे अर्थ सांगणे. संदर्भाने अर्थ बदललेले शब्द निवडणे. अशा शब्दांनी भाषेला आलेले सौंदर्य लक्षात घेऊन त्या अलंकाराचे श्लेष हे नाव लक्षात ठेवणे. त्याची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन व्याख्या तयार करणे. | भाषेचे सौंदर्य आणि सामर्थ्य लक्षात येते. | आपल्या भाषेचा अभिमान वाटतो. | – | तोंडीकाम चाचणी<br>– |
| दृष्टांत | विनोबाजींच्या लेखनातील तसेच ‘केला जरी पोत..’ सारखी वचने देऊन त्यातील समान वैशिष्ट्ये | चर्चा करून दिलेल्या उदाहरणांतील समानता शोधून काढणे. समानतेत कोणते सौंदर्य | भाषेचे सौंदर्य आणि सामर्थ्य लक्षात येते. | आपल्या भाषेचा अभिमान वाटतो. | दिलेल्या गद्य उताऱ्यातून, पद्यपंक्तीतून श्लेष, दृष्टांत, स्वभावोक्ती अलंकार | लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | ओळखण्यास सांगणे. | दडलेले आहे ते शोधणे. या अलंकाराची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्याची व्याख्या तयार करणे. | | | ओळखतात व स्पष्टीकरण देतात. | |
| स्वभावोक्ती | डोळे मिटावयास सांगून 'मातीत ते पसरले अति रम्य पंख..' किंवा 'त्या तिथे... पलिकडे..' सारखी उदाहरणे म्हणून दाखविणे. कोणता अनुभव आला ते विचारणे. | बंद डोळ्यांसमोर हुबेहुब चित्र उभे राहिल्याचा अनुभव वर्णन करणे. स्वतः काही उदाहरणे देण्याचा प्रयत्न करणे. व्याख्या करणे. | – | – | दिलेल्या काव्यपंक्तींमधून स्वभावोक्तीची उदाहरणे निवडणे आणि निवडीची कारणे लिहिणे. | लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

## अध्ययन क्षेत्र – ४. साहित्यिक अभिव्यक्तींचा आस्वाद

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| भाषिक सौंदर्य | सुंदर भाषा असलेले गद्य, पद्य उतारे वाचावयाला देऊन त्यांतील सौंदर्याची उदाहरणे देण्यास सांगणे. | उताऱ्यांचे निरीक्षण करून त्यातील नादमय शब्द, चित्रदर्शी शब्द, सामासिक शब्द, वाक्ये, म्हणी, वाक्प्रचार, अलंकार तसेच वास्तवदर्शी व कल्पनारम्यता निर्माण करणारी वर्णने यांची उदाहरणे शोधणे. | भाषा अनेक अंगांनी सुंदर बनते याची पुन्हा जाणीव होते. | नवीन ज्ञानाचा आनंद होतो. | दिलेले विचार, कल्पना, भावना सुंदर भाषेत तोंडी व लेखी सादर करतात. | तोंडी व लेखी चाचणी (निबंधलेखन) |
| कवी, लेखकांचे वेगळेपण | एकाच विषयावरील विविध साहित्यप्रकारांमधील पाठ्य व पाठ्येतर साहित्यातील नमुन्यांची तुलना करण्यास सांगणे. | कवी, लेखकांनी निवडलेला साहित्यप्रकार आणि त्यामुळे प्रकटीकरणात पडलेले फरक शोधून काढणे. | व्यक्तिनुसार प्रकटीकरणात फरक पडतो हे लक्षात येते. | पूर्वी वाचलेल्या साहित्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिल्यामुळे मिळणारा वेगळा आनंद अनुभवतात. | व्यक्तिनुसार प्रकटीकरणात पडणारा फरक सोदाहरण स्पष्ट करतात. | तोंडी व लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| मूल्ये – साहित्यातून शाश्वत आणि घटनात्मक मूल्यांचे होणारे जतन | संतकाव्य, आधुनिक कविता, कथा, नाटक, निबंध यात पुरस्कारिलेली मूल्ये शोधण्यास सांगणे. | विविध साहित्यप्रकारांतून कवी, लेखक, यांनी पुरस्कारलेल्या मूल्यांची उदाहरणे शोधून काढतात. | साहित्य मनोरंजनाबरोबरच मूल्यसंस्कारही करते हे लक्षात येते. | साहित्यातून प्रकट झालेली आणि पटलेली मूल्ये वर्तनात आणण्याचा यत्न करतात. | विद्यार्थ्यांनी वागण्यात कोणत्या मूल्यांचा अवलंब केला पाहिजे ते सकारण स्पष्ट करतात. | तोंडी चाचणी (भाषण)<br>लेखी चाचणी (प्रश्नोत्तरे) |

## अध्ययन क्षेत्र – ४. स्व–प्रकटीकरणाचे प्रयत्न

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| साहित्य (सामाजिक समस्यांवरील बोलीभाषेतील) | आपल्या परिसरातील सामाजिक समस्यांवर बोलीभाषेत लेखन करण्यास प्रवृत्त करणे. | आपल्या परिसरातील तीव्रतेने जाणवणाऱ्या सामाजिक समस्यांवर आपापल्या | आपल्या परिसरातील लोकांपर्यंत पोहचण्याचा मार्ग बोलीभाषेतून त्यांच्याशी संवाद साधणे हाच आहे हे पटते. | आपल्या लोकांशी संवाद साधण्यासाठी केलेल्या निर्मितीचा आनंद होतो, अभिमान वाटतो. | परिसरातील कार्यक्रमात आपल्या लेखनाचे सादरीकरण करतात. | लेखन व नोंद |

| भाषिक संबोधांची काही उदाहरणे | सुलभकांच्या (पालक, मित्र, शिक्षक) कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांच्या कृतींची काही उदाहरणे | विद्यार्थ्यांमधील संभाव्य बदलांची काही उदाहरणे | | | मूल्यमापनाच्या पद्धती, तंत्रे व साधने यांची काही उदाहरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बोधात्मक | भावात्मक | कौशल्यात्मक | |
| | | बोलीभाषेत लेखन करण्याचा प्रयत्न करणे. | | | | |
| निखळ आनंद देणारे साहित्य | आपल्याला आवडणाऱ्या साहित्यप्रकारात आपल्या आवडत्या विषयावर लेखन करणे. | आपल्या मनाला भावलेल्या व्यक्ती, घटना, स्थळे, अन्य विषय यावर कविता, विनोदी लेख, नाटक, प्रवासवर्णन इत्यादी साहित्यप्रकारात लेखन करणे. | स्वतःला आनंद देणारे लेखन करणे तुलनेने सोपे आणि आनंददायी असते हे लक्षात येते. | स्वनिर्मितीने सुखावतात. | मित्रांच्या मेळाव्यात आपले लेखन आवर्जून वाचून दाखवितात. | तोंडी व लेखी चाचणी |